महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
चौथा मजला ,मुख्य इमारत ,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-४०० ०३२
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दूरध्वनी क्र २२७९४१९५-०२२. E-mail : nitin.shelke@nic.in

क्रमांक:-संकीर्ण-५०२१/सं.क्र.१६९७/नवि-२७ **दिनांक:-०८.११.२०२१.**

प्रति,

संचालक,
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,
पुणे.

विषय:- **नगर रचनाकार संवर्गातील अधिकारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ अनुज्ञेय करण्याबाबत.**
**श्री.सु.तु.शिंदे, तत्कालीन नगर रचनाकार.**

संदर्भ:- १. आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.आस्था/सुतुशिं-नर/आ.प्र.यो.लाभ/प्रशा-१/४९४२, दि.२७.१०.२०२१.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सेप्रनि-२००२/प्र.क्र.१४/०२/१२, दि.०२.०९.२००३.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय क्र.१ येथील पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, श्री.सु.तु.शिंदे, नगर रचनाकार यांना अंबरनाथ नगरपरिषद, जि.ठाणे येथे कार्यरत असताना बांधकाम परवानगी प्रकरणांमध्ये नियमापेक्षा जास्त चटई क्षेत्र निर्देशांक देऊन प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदींचा भंग केल्याप्रकरणी त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करुन त्यांना दि.०३.०५.२००६ रोजीच्या आदेशान्वये शासन सेवेतून बडतर्फ केले होते.

२. त्यानुंषगाने, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि.१८.०१.२०१७ रोजी दिलेले आदेश, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.०५.०१.२०२१ रोजी दिलेले आदेश व मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दि.२९.०६.२०२१ रोजी दिलेले आदेश विचारात घेता, श्री.सु.तु.शिंदे, तत्कालीन नगर रचनाकार यांच्यावर दि.०३.०५.२००६ रोजीच्या आदेशान्वये लादलेली शिक्षा दि.३०.०७.२०२१ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आला असून, दि.११.०८.२०२१ रोजीच्या आदेशान्वये श्री.शिंदे, तत्कालीन नगर रचनाकार यांचा दि.०३.०५.२००६ ते दि.२८.०२.२०२१ हा कालावधी सेवाविषयक सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणून "कर्तव्य कालावाधी" म्हणून घोषित करण्यात आला आहे.

३. श्री.शिंदे, तत्कालीन नगर रचनाकार यांना दि.०३.०५.२००६ पासून शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले असल्यामुळे, यापूर्वी आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय करण्यासाठी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये त्यांचेकडून जात वैधता प्रमाणपत्राची मागणी करण्याचा अथवा त्यांचे नावाचा विचार करण्याचा प्रश्न उद्भवला नाही. तसेच, श्री.शिंदे हे दि.०१.०८.२०११ नंतर शासकीय सेवेत असते तर त्यांना या दिनांकानंतर प्रथमत: झालेल्या आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेकामी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीवेळी प्रथमत: जाती दावा पडताळणी प्रमाणपत्राची

मागणी केली असती तर त्यांना ते उपलब्ध करुन देणे शक्य होते. श्री.शिंदे हे पदविकाधारक असल्याने, दि.०१.०८.२०११ रोजीचे सेवा प्रवेश नियम प्रसिध्द होण्यापूर्वी सहायक संचालक, नगर रचना या पदावर पदोन्नतीची संधी उपलब्ध नव्हती. त्यामुळे, दि.०१.०८.२०११ रोजीचे सेवाप्रवेश नियमातील तरतुदी विचारात घेता, श्री.शिंदे यांना दि.०१.०८.२०११ पासून नियमानुसार आश्वासित प्रगती योजना पहिला लाभ अनुज्ञेय आहे. अशा परिस्थितीत आता, श्री.शिंदे, तत्कालीन नगर रचनाकार यांना जात वैधता प्रमाणपत्र दि.०८.१०.२०२१ रोजी मिळाले असल्यामुळे व ते दि.२८.०२.२०२१ रोजी शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्यामुळे, त्याचप्रमाणे मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि.१८.०१.२०१७ व दि.१२.०८.२०२१ रोजी दिलेले आदेश, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.०५.०१.२०२१ रोजी दिलेले आदेश व मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दि.२९.०६.२०२१ रोजी दिलेले आदेश विचारात घेता, श्री.शिंदे यांना दि.०१.०८.२०११ पासून नियमानुसार आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

४. तसेच, संदर्भीय क्र.२ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार श्री.शिंदे यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यासाठी त्यांना संगणक अर्हततेमधून सूट देण्यात येत आहे.

५. प्रसंगत: असे नमूद करण्यात येते की, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि.१२.०८.२०२१ रोजी दिलेले आदेश विचारात घेता, श्री.शिंदे, तत्कालीन नगर रचनाकार यांना अनुज्ञेय असलेले लाभ व निवृत्तीवेतन अदा करण्याबाबतची कार्यवाही तत्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा, हि विनंती.

**आपला**

**(हर्षवर्धन जाधव)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

निवडनस्ती / नवि-२७.